२९५/५

मुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
कोकण भवन सहावा मजला,
नवी मुंबई ४०० ६१४.
दिनांक :- 20 नवम्बर NOV 2002

कार्यालयीन आदेश क्रमांक २८

विषय :- जिल्हा परिषद/पंचायत समितीचे थकीत लेखा परीक्षण नियमित लेखा परीक्षणाबरोबर केल्यास अहवाल एकत्रित निर्गमित करणे बाबत.

जिल्हा परिषद व पंचायत समितीचे एखादया वित्तिय वर्षाचे नियमित लेखा परीक्षण पुर्ण झाल्यावर त्यावरील सर्व लेखा परीक्षण अहवाल निर्गमित केले जातात. या अहवालांच्या अनुषंगाने त्या वित्तिय वर्षाचा लेखा परीक्षण पुनर्विलोकन अहवाल तयार केला जातो. परंतु नियमित लेखा परीक्षणा मधील एखादया जिल्हा परिषद विभागाचे अथवा पंचायत समितीचे लेखा परीक्षण अपरिहार्य कारणास्तव राहून गेल्यास ते लेखा परीक्षण पुढील वित्तिय वर्षी हाती घेण्यात येते. या दोन वित्तिय वर्षाचे अहवाल स्वतंत्र निर्गमित केल्यास प्रलंबित असलेल्या लेखा परीक्षण अहवालावर त्या वर्षाचा पुनर्विलोकन अहवाल निर्गमित झालेला असल्याने कोणतीही कार्यवाही उरत नाही. याकरीता असे अहवाल यापुढे स्वतंत्रपणे निर्गमित न करता एकत्रित निर्गमित करण्यात यावे. जसे सन १९९९-२००० चे भविष्य निर्वाह निधी विभागाचे लेखा परीक्षण प्रलंबित असतांना ते सन २०००-२००१ चे चालू लेखा परीक्षणाबरोबर करण्यात आले तर या दोन वित्तिय वर्षाचे अहवाल स्वतंत्र निर्गमित न करता एकत्रित [सन९९-२०००-२००१] असा अहवाल निर्गमित करण्यात यावा.

मुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य,
नवी मुंबई.

प्रत,

१] उपमुख्य लेखा परीक्षक [वरिष्ठ], स्थानिक निधी लेखा विभाग
२] उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, जिल्हा [सर्व]
३] उपमुख्य लेखा परीक्षक [पंरास], स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
४] अधिक्षक [अहवाल/~~पंरास~~]
५] सहाय्यक अधिक्षक [अहवाल].
६] अभिलेखापाल
७] निवडनस्ती.